ePaper
मोदी अमेरिकेत रचणार इतिहास, 22 जून रोजी होणार अनोखा विक्रम



| वर्ष - 7 । अंक -41 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- जेजुरी बंदचा निर्णय दोन दिवसात, विश्वस्त निवडीचा वाद चिघळणार!
- लांडे समर्थकांचा अपेक्षाभंग!

www.mahaenews.com | ।बुधवार, दि. 7 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# प्रशासन, संस्थानकडून पालखी प्रस्थान सोहळ्याची जय्यत तयारी!

## वारकऱ्यांना आरोग्य सेवा, पावसापासून संरक्षण मिळावे यासाठी विशेष काळजी

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**संत तुकाराम महाराजांची पालखी दहा जून रोजी तर संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा ११ जून रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. या पार्श्वभूमीवर देहू आणि आळंदीतील संस्थान आणि प्रशासनाच्या निरनिराळ्या विभागांनी विशेष तयारी केली आहे. आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराज पालखी सोहळा अवघ्या चार दिवसांवर आहे. या पार्श्वभूमीवर संत तुकाराम महाराज संस्थानने जय्यत तयारी केली आहे. पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंडीतील वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी, आरोग्य सेवा आणि पावसापासून संरक्षण मिळावे, या साठी संत तुकाराम महाराज संस्थानने विशेष काळजी घेतली आहे.**

आषाढी वारीसाठी जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळा येत्या दहा जूनला देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. या पार्श्वभूमीवर संत श्री तुकाराम महाराज संस्थानने जय्यत तयारी केली आहे. या बाबत पालखी सोहळा प्रमुख संजय महाराज मोरे म्हणाले, "पालखी सोहळ्यातील चांदीचा रथ, अब्दागिरी यांना पॉलिश करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यात ३२९ दिंड्यांची नोंद आहे. नव्याने ४५ दिंड्या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. सोहळ्यातील सर्व दिंडीप्रमुखांना



संस्थानने पत्रव्यवहार केला आहे. तसेच वाहनांसाठी पास देणे सुरू आहेत. खडकी येथील लष्कराच्या ५१२ डेपोमध्ये चांदीच्या रथाच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. हायड्रॉलिक ब्रेक बसविण्यात आले आहेत. तसेच रथावर जीपीएस सिस्टीम बसविण्यात आली आहे. तसेच आठ सीसीटिव्ही कॅमेरे, जनरेटर बसविण्यात आले आहेत.

**देहू-आळंदीत वारीच्या तयारीची लगबग सुरु!** पान 2 वर

"पालखी सोहळा तयारी पूर्ण झाली आहे. दिंडीकराना पत्रव्यवहार झाला आहे. सरकारकडून विविध सोयी सुविधा देण्यासाठी कळविले आहे. देऊळवाडा येथे महिलांसाठी हिरकणी कक्ष सुरू करण्यात येत आहे."

**- पुरुषोत्तम महाराज मोरे,**
अध्यक्ष, संत तुकाराम महाराज संस्थान, देहू

### आळंदीत अवजड वाहने, चारचाकींना बंदी...

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त ७ ते १२ जून दरम्यान आळंदीत औद्योगिक अवजड वाहन आणि चारचाकी वाहनांना प्रवेशबंदी राहणार असल्याची माहिती वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक शहाजी पवार यांनी दिली. श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ११ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. १२ जूनला पालखी पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे. राज्यभरातून वारकरी पालखी सोहळ्याला उपस्थित राहतात. त्यामुळे आळंदीत वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन केले आहे. उद्यापासून म्हणजेच ७ ते १२ जूनपर्यंत अवजड, चारचाकी वाहनांना प्रवेश बंदी असणार आहे. केवळ अत्यावश्यक सुविधा पुरविणारी आणि दिंडीची वाहने वारी काळात आळंदीत सोडली जाणार आहेत.

# गुंडा विरोधी पथकाने दोन महिन्यात केले २१ गुन्हेगारांना जेरबंद

## पिंपरी-चिंचवडच्या आयुक्तालयात 130 गुणांची कमाई करतनंबर 1 कामगिरी!

**। पिंपरी । महाईन्यूज**

**पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत अव्वल कामगिरी करणाऱ्या गुंडा विरोधी पथकाला पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केल आहे.**

पाहिजे आणि फरार आरोपींचा शोध घेण्यात गुंडाविरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश माने यांच्या टीमला यश आलेले आहे. त्यांच्या टीमला १३० गुण पोलिस आयुक्तांनी दिले. दुसऱ्या क्रमांकावर गुन्हे शाखा युनिट तीन आणि तृतीय क्रमांकावर गुन्हे शाखा युनिट एक यांचा समावेश आहे. फेब्रुवारी २०२३ ते मार्च २०२३ यादरम्यान पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत फरार आणि पाहिजे आरोपी पकडण्याबाबत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी गुन्हे शाखा आणि गुंडा विरोधी पथकाला आदेश दिले होते. गुंडा विरोधी पथकाने गेल्या दहा वर्षापासून पाहिजे असलेल्या आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. पोलिस आयुक्त चौबे यांनी पाहिजे आरोपीला ५ गुण तर फरार आरोपीला पकडल्यास २५ देणार होते. गुंडा विरोधी पथकाने एकूण २१ पाहिजे आणि फरार आरोपींना पकडून १३० गुणांची कमाई केली. पोलिस आयुक्तालयात अव्वल नंबर मिळवला आहे. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शहरातील गुंडगिरी कमी करण्यासाठी आदेश दिले होते. शहरातील समूळ गुन्हेगारी कमी करण्याबाबत वारंवार पोलिस आयुक्तांनी आदेश दिले.



# पुणे महापालिकेला तृतीय पुरस्कार!

## ‘माझी वसुंधरा अभियान 3.0’ अंतर्गत राज्य सरकारकडून सन्मान

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे - कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण, वृक्षारोपण अशा विविध घटकांमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य सरकारकडून ‘माझी वसुंधरा अभियान ३.०’ याअंतर्गतचा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पुणे महापालिकेला प्राप्त झाला आहे. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार यांनी हा पुरस्कार स्वीकारला.**




राज्य सरकारच्यावतीने पर्यावरण जनजागृतीसाठी ‘माझी वसुंधरा अभियान ३.०’ हे अभियान राज्य पातळीवर राबविले आहे. या अभियानाचे यंदा तिसरे वर्ष आहे. त्यादृष्टीने सोमवारी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून यंदाच्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. मुंबई येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार यांनी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, उपायुक्त माधव जगताप, पर्यावरण अधिकारी मंगेश दिघे, सल्लागार पूजा ढोले यावेळी उपस्थित होत्या.

### या कामासाठी मिळाला पुरस्कार

**‘माझी वसुंधरा’ या अभियानांतर्गत विविध घटकांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य सरकारकडून पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला जातो. ‘माझी वसुंधरा अभियान ३.०’ मध्ये भूमी, जल, वायू, अग्नी व आकाश या पंचमहाभूतांवर आधारित स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत केलेल्या कामाचे मूल्यमापन करण्यात आले होते.**

**या स्पर्धेअंतर्गत ‘१० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली अमृत शहरे’ या गटामध्ये सर्वोत्तम कामगिरी केल्याबद्दल पुणे महानगरपालिकेस तृतीय क्रमांक जाहीर करण्यात आला. दरम्यान, पिंपरी चिंचवड शहराने प्रथम क्रमांक तर नवी मुंबईने द्वितीय क्रमांक पटकाविला.**

# देहू-आळंदीत वारीच्या तयारीची लगबग सुरु!

## भाविकांची सुरक्षा आणि संशयित घडामोडींवर नियंत्रण ठेवण्यासाठी 95 सीसीटीव्ही कॅमेरे

।आळंदी । महाईन्यूज

**संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याचे देऊळवाड्यातील थेट प्रक्षेपण रविवारी (ता. ११) केले जाणार असून, शहरातील विविध सहा ठिकाणांसह दर्शबारीत मोठे स्क्रीन लावण्यात येणार आहे. तसेच, देऊळवाड्यातील भाविकांची सुरक्षा आणि संशयित घडामोडींवर नियंत्रण ठेवण्यासाठी ९५ सीसीटीव्ही कॅमेरे देऊळवाडा आणि परिसरात लावले आहेत.**

आषाढी वारी सोहळ्यानिमित्त आळंदीत पालखी प्रस्थान येत्या रविवारी आहे. मंदिरातील गर्दीचे नियोजन, घातपात अथवा चोरीसारख्या घटनांवर नजर ठेवण्यासाठी देवस्थान व्यवस्थापनाने ९५ सीसीटीव्ही कॅमेरे विविध ठिकाणी लावले आहेत. मंदिराभोवतीही कॅमेरे लावले जाणार आहेत. प्रस्थान सोहळ्याचे थेट प्रक्षेपण मंदिराबाहेरील भाविकांना केले जाणार आहे.

एकाच ठिकाणी भाविकांची गर्दी होऊ नये, यासाठी ही सोय केली जात आहे. यासाठी प्रदक्षिणा रस्ता, भराव रस्ता, वडगाव चौक, मरकळ चौक, पालिका चौक, इंद्रायणी घाट आणि दर्शन मंडप, अशा सहा ठिकाणी स्क्रीन लावले जाणार आहेत. मंदिर स्वच्छतेसाठी देवस्थानचे ३५ कर्मचारी आणि स्वकाम सेवा मंडळाचे दोनशे स्वयंसेवक एका वेळी २५च्या गटाने २४ तास स्वच्छता करणार आहेत. महाद्वार, गाभारा मंदिरात पोलिसांचा स्वतंत्र बंदोबस्त आहे.



### तयारी दृष्टिक्षेपात

- आळंदी शहरात सहा ठिकाणी स्क्रीन
- ९५ सीसीटीव्ही कॅमेरे
- कर्मचारी, स्वयंसेवक २४ तास स्वच्छता करणार
- महाद्वार, गाभारा मंदिरात पोलिसांचा स्वतंत्र बंदोबस्त
- सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर

# कोट्यवधींची ‘उड्डाणे’; पुलांखाली अस्वच्छता



। पुणे । महाईन्यूज ।

पुणे शहरात होणाऱ्या ‘जी २०’ परिषदेच्या निमित्ताने कोट्यवधी रुपये खर्च करून उड्डाणपुलांवर रंगरंगोटी, सुशोभीकरण, विद्युत रोषणाई केली जात आहे. मात्र, उड्डाणपुलांखालील स्थिती अतिशय विदारक असून प्रचंड अस्वच्छता, भंगार व्यावसायिकांसह इतरांनी सुरू केलेला जागेचा वापर, अनेकांकडून होत असलेल्या अतिक्रमणांमुळे ही ठिकाणे शहराच्या विद्रूपीकरणात भर घालत आहेत. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

### धोरण अद्यापही अभाव

पुणे शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी, तसेच महत्त्वाच्या चौकांतील वाहतूक सुरळीत करण्यासाठी महापालिकेने अनेक उड्डाणपूल बांधले आहेत. सद्यःस्थितीत शहरात १३ उड्डाणपूल आहेत. पण उड्डाणपूल बांधल्यानंतर त्याच्या खालील मोकळ्या जागेचा वापर कसा करावा, याचे धोरण अद्याप निश्चीत होऊ शकलेले नाही.

### फेरयाचिका दाखल

मुंबई महापालिकेने उड्डाणपुलाखाली पार्किंग केल्याने याविरोधात काही जणांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ‘पार्किंग करता येणार नाही; पण सुशोभीकरण करता येईल,’ असा आदेश न्यायालयाने दिला होता. त्यानंतर पुन्हा एकदा या निर्णयाचा पुनर्विचार व्हावा, यासाठी फेरयाचिका दाखल केली आहे. पण, त्याचा निर्णय अद्याप झालेला नाही. त्यामुळे पुणे महापालिकेला उड्डाणपुलांच्या खालील जागेच्या वापराचे धोरण निश्चित करता आलेले नाही.

# शरद पवारांच्या मध्यस्थीनंतरही शिरूर मतदारसंघाचा तिढा सुटेना?

## विलास लांडेंच्या वक्तव्यानंतर चर्चेला पुन्हा सुरुवात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिरूर लोकसभा मतदारसंघावरून राष्ट्रवादीत घमासान सुरू आहे. ही जागा अमोल कोल्हेंनाच मिळणार असल्याचे जवळपास निश्चित झालेले असताना राष्ट्रवादीचे माजी आमदार विलास लांडे यांनी पुन्हा या जागेसाठी इच्छा व्यक्त केली आहे. दरम्यान, आज एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीतही त्यांनी त्यांची इच्छा बोलून दाखवली. त्यामुळे शरद पवारांच्या मध्यस्थीनंतरही शिरूर लोकसभा मतदारसंघाचा तिढा अद्यापही सुटलेला दिसत नाहीय.**





राष्ट्रवादीच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीतील चर्चेनुसार शिरूरच्या जागेवरून अमोल कोल्हे यांनाच तिकिट देण्यात येणार आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादीचे अमोल कोल्हे खासदार आहेत. २०१९ च्या निवडणुकीत त्यांनी मुसंडी मारत हा मतदारसंघ आपल्या ताब्यात घेतला. आता आगामी लोकसभा निवडणुकीच्या आधीच अमोल कोल्हेंच्या भाजपासोबत गाठीभेटी वाढल्याने ते भाजपाच्या वाटेवर असल्याचं बोललं जातंय. त्यामुळे माजी आमदार विलास लांडे या जागेवरून निवडणूक लढवण्यास इच्छूक आहेत.

परंतु, आपण भाजपासोबत जाणार नसल्याचं अमोल कोल्हे यांनी जाहीर केल्यानंतर शिरूरमधील तिढा जवळपास संपला होता. परंतु, एक आदर्श डोळ्यांसमोर ठेवला आहे. पवार साहेबांनी दुसरीकडे कुठेही संधी दिली तरीही काम करायला तयार आहे. संधी नाही दिली तरी काम करणार आहे", असं विलास लांडे म्हणाले.

### शिरूर लोकसभा मतदारसंघाची जागा कोल्हेंनाच?

» राष्ट्रवादीच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीतील चर्चेनुसार शिरूरच्या जागेवरून अमोल कोल्हे यांनाच तिकिट देण्यात येणार आहे. याबाबत खुद्द शरद पवार यांनीच मध्यस्थी केले असल्याचं म्हटलं जातंय. परंतु, तरीही माजी आमदार विलास लांडे या जागेवरून इच्छूक आहेत.

### काय म्हणाले विलास लांडे?

» विलास लांडे म्हणाले की, "शरद पवारांचे विचार राज्यात आणि देशात नेणारे आम्ही कार्यकर्ते आहोत. अनेक कामं पूर्ण होण्याकरता पवारांनी काम करण्याची संधी दिली तर काम करायला आवडेल. विरोध होऊन काम करणार नाही. अमोल कोल्हे एक चांगला अभिनेता आहे. तो अभिनेता संभाजी महाराजांची भूमिका पार पाडणारा आहे.

# पालखी सोहळ्यामुळे उद्यापासून आळंदीत अवजड वाहने, चारचाकींना बंदी

## वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक शहाजी पवार यांनी दिली माहिती

। पिंपरी । महाईन्यूज

**श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त ७ ते १२ जून दरम्यान आळंदीत औद्योगिक अवजड वाहन आणि चारचाकी वाहनांना प्रवेशबंदी राहणार असल्याची माहिती वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक शहाजी पवार यांनी दिली.**



श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त ७ ते १२ जून दरम्यान आळंदीत औद्योगिक अवजड वाहन आणि चारचाकी वाहनांना प्रवेशबंदी राहणार असल्याची माहिती वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक शहाजी पवार यांनी दिली.

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ११ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. १२ जूनला पालखी पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे. राज्यभरातून वारकरी पालखी सोहळ्याला उपस्थित राहतात. त्यामुळे आळंदीत वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन केले आहे. उद्यापासून म्हणजेच ७ ते १२ जूनपर्यंत अवजड, चारचाकी वाहनांना प्रवेश बंदी असणार आहे. केवळ अत्यावश्यक सुविधा पुरविणारी आणि दिंडीची वाहने वारी काळात आळंदीत सोडली जाणार आहेत.औद्योगिक व चारचाकी वाहने आळंदीला न सोडता ती सहा सात किलोमीटर दूरवरच अडवून अन्य मार्गाने वळवली जाणार आहे.

औद्योगिक भागातील अवजड वाहने आणि कामगारांना ने-आण करणारी वाहने, शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी वाहने यांना याबाबत पोलिसांकडून वाहतूक नियोजनाबाबत कळवले आहे. पुण्याहून आळंदीला येणारी वाहने मॅक्झिन चौकातून भोसरीमार्गे वळवली जातील. मोशी-देहू फाटामार्गे आळंदीत येणारी वाहने डुडुळगावपुढील हवालदारवस्तीवर अडवली जातील. चाकणहून आळंदीला येणारी वाहने आळंदी फाट्यावर अडवली जाणार आहेत. वडगाव घेनंद-शेलपिंपळगावमार्गे येणारी वाहतूक कोयाळी फाट्यावर अडवली जातील. मरकळ औद्योगिक भागातून येणारी वाहने धानोरे फाट्यावर चऱ्होली बायपासवर अडवली जाणार आहेत. चिंबळी केळगावमार्गे येणारी वाहने चिंबळी फाट्यावरच अडवली जाणार आहेत. आळंदीत वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडी वाहनांना प्रवेश दिला जाईल.

> पालखी सोहळ्यानिमित्त अवजड वाहने आणि चारचाकींना उद्यापासून सोमवारपर्यंत आळंदीत प्रवेशबंदी असणार आहे. कामानिमित्त आळंदीतून बाहेर जाणा-या कर्मचा-यांना पास दिले जाणार आहेत.
>
> -शहाजी पवार, पोलीस निरीक्षक,वाहतूक विभाग

# सामाजिक समन्वयाची गरज!




नांदेड जिल्ह्यातील अक्षय भालेराव या तरुणाची हत्या काही जातीयवाद्यांनी केल्यावर राज्यात पुन्हा या विषयावरील चर्चेला तोंड फुटले आहे. सगळ्याच जाती धर्मातील लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले असताना जातीय,धर्मीय अभिनिवेश त्या सोबतच मोठा होताना दिसत आहे. उच्चशिक्षित व्यक्ती जाती,धर्माच्या बैठका घेतात तेव्हा त्यांना आपण काही चुकीचे करीत आहोत असे अजिबात वाटत नाही हे मानवतेची वाट धूसर होण्याचे लक्षण म्हणावे लागेल. आपण सगळे लोक तोंडभरून फुले,शाहू आणि आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतो आणि मानतो सुद्धा मग या महा मानवांच्या अनुयायांत एकी नको का ? एकदा एकी नसेल तरी चालेल परंतु एकमेकांचे रक्त सांडणारे शत्रुत्व नसायला हवे. लोक संपर्काची असंख्य साधने सध्याच्या काळात निर्माण झाली आहेत मात्र आपलाच गावातील कुण्या शेजाऱ्याशी संपर्क राहिला नाही. संवादाच्या अभावाने असूया नि पूर्वग्रह तयार होतात आणि त्याचे पर्यवसान माणसांचे मुडदे पाडण्यात होत असेल तर संवादाला नव्याने सुरुवात व्हायला काय हरकत आहे ?



गावातील सार्वजनिक उत्सव काही खंडीभर नसतात,वर्षातून काही ठराविक उत्सव सर्व जाती धर्मातील महामानवाचे येतात त्यासाठी प्रत्येक गावात सामाजिक समन्वय समिती स्थापन करून उत्सव साजरे करायला सुरुवात झाल्यास सामाजिक किंवा धार्मिक खटके उडणार नाहीत. अनेक गावात अश्या सामाजिक समन्वय संघ किंवा समित्या गावकऱ्यांनी पुढाकार घेत स्थापन केले आहेत. पोलिसांच्या शांतता समित्या असतात मात्र मात्र त्या कोणत्याही उत्सवाच्या चार दिवस अगोदर जिवंत होतात ,त्यातून गावासाठी फार काही हातात लागत नाही. सगळ्या जातीधर्मातील विचार करणाऱ्या लोकांनी स्वतःहून पुढाकार घेत अश्या सामाजिक समन्वय समित्यांचे गठन गावात करायला हवे. संधीसाधू,नासके कांदे किंवा समाजकंटक ही प्रवृत्ती सगळीकडे असते. गावात काही वर्ष शांतता असलेली अश्याना पचत नाही त्यामुळे असे समाजकंटक आपल्या कृतीने सगळ्यांना कामाला लावत असतात.

शिवजयंती,फुले जयंती,भीमजयंती ,ताजिया मिरवणूक अश्या प्रमुख सामाजिक उत्सवात त्या त्या समाजातील अतिउत्साही तरुणांकडे समाजातील जबाबदार लोकांनी विशेष लक्ष देऊन गावाची शांतता भंग होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. गरज नसताना अनावश्यक गुलाल, नीळ किंवा कुणाच्या भावनांना ठेस पोहोचवणारी गाणी लावण्याचा आग्रह ,उगाच कुणाला आव्हान देणाऱ्या घोषणा किंवा सोशल मीडियावरील पोष्ट गावातील वातावरण खराब करून आजपर्यंतच्या सौहार्दाला नख लावू शकतात हे ओळखून आपापल्या जाती,धर्मातील अति शहाण्या लोकांना वेळीच रोखण्याचे काम झाले तर त्याचे परिणाम गावाला दीर्घकाळ भोगावे लागणार नाहीत. अनेकदा असे अतिउत्साही तरुण गावातील ज्येष्ठाना कुठलाही सन्मान देत नाहीत त्यांचा कोणताही सल्ला ऐकत नाहीत अश्यावेळी गावात " सामाजिक समन्वय समिती " गठीत करायला हवी . त्यातून समस्या निवारण व्हायला सुरुवात होईल.

सगळ्यांनी मिळोनि मिरवीत जावे, थोर पुरुषांचे गोडवे गावे
पूर्वऋषीचे कौतुक करावे ,गौरवावे राष्ट्राशी !

या अतिशय नेमक्या शब्दात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाला उत्तम संदेश देऊन ठेवला आहे. गावात उत्सव कोणत्याही महापुरुषाचा असो तो आपला आहे हे मानून त्यानिमित्य वैचारिक आनंद घेण्याची उर्मी ज्या समूहात असते तिथे वितंडवाद कधीच होत नाहीत. खास करून अश्या उत्सवादरम्यान जुने राजकीय बदले घेण्याची अनेकांची खुमखुमी उफाळून येते. कुणाचा तरी नुकताच गावात पराभव झालेला असतो आणि असे उत्सव जखमांवरील खपल्या काढण्यासाठी वापरले जातात त्यातून रक्तपात घडवला जातो. आता अशी बदमाशी समाजाने ओळखून अश्या उपट सुम्भाचा बंदोबस्त केला पाहिजे नाहीतर त्याचे परिणाम संपूर्ण गावाला भोगावे लागतात.

सामाजिक समन्वय संघ किंवा समिती त्यावरचा चांगला उपाय ठरू शकतात त्यासाठी गावातील विविध जाती,धर्मातील आदरणीय व्यक्ति,पत्रकार,सामाजिक धार्मिक संघटनांचे प्रतिनिधी ,ग्राम पंचायत सदस्य .महिला,पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधींचा समावेश असायला हवा. कोणत्याही जाती,धर्माच्या मिरवणुकीत बाहेरचे असामाजिक तत्व सहभागी होणार नाहीत याचीही काळजी घेतली पाहिजे. एका समाजाच्या मिरवणुकीचे दुसऱ्या समाजाने आपल्या परीने गावातील सार्वजनिक स्थळ नक्की करून स्वागतकेले पाहिजे. असे केल्यास गावात उत्सवाचे निकोप वातावरण निर्माण होऊन या सामाजिक ऐक्याला नख लावण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही. कोणत्याही उत्सवाचा वैचारिक प्रबोधन हा महत्वाचा भाग असला पाहिजे , भोजन,भंडारा किंवा पंगती पेक्षा वैचारिक ज्ञान दान याला महत्व दिल्यास काही वर्षात गावात उत्तम सलोख्याचे वातावरण नक्कीच तयार व्हायला मदत होईल.

## संपादकीय »

### दारूबंदीचा बिहारी धडा

***बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी गेली सात वर्षे संपूर्ण राज्यात दारूबंदी यशस्वी करून दाखविली आहे. हा सरकारचा पक्का निर्धार त्यांनी संपूर्ण नोकरशाही, व्यवस्था आणि समाजात रुजविला आहे. महाराष्ट्राला बिहारकडून शिकण्यासारखे बरेच काही आहे...***

बिहार राज्यात २०१६ पासून दारूबंदी लागू आहे. या सात वर्षांत तिची अंमलबजावणी व परिणाम बघण्याची या विषयातला कार्यकर्ता म्हणून उत्सुकता होती; त्यामुळे बालविवाह अभ्यासासाठी बिहारात गेल्यावर, दारूबंदीचे यशापयश बघण्याचा प्रयत्न केला. अनेकदा सरकार दारूबंदी करते; पण त्या मागे सरकारची शक्ती आणि इच्छाशक्ती उभी नसते. आज सात वर्षांनंतर बिहार सरकार तितकेच गंभीर आहे. हजारो महिलांच्या मागणीवरून मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी दारूबंदी लागू केली होती. दारूबंदीच्या कारवाया सुरू ठेवून, प्रबोधन व उपचार यांवरही भर दिला, हे अधिक महत्त्वाचे आहे. व्यसनमुक्तीची पूर्वअट ही असते, की अमली पदार्थ सहज उपलब्ध नसावेत. ते दारूबंदीने साध्य होते.

**नवे शैक्षणिक सत्र सुरू होत आहे. मातृभाषेचा मुद्दा पुन्हा चर्चेत येणे ओघाने आलेच. मराठी भाषेची होत असलेली गळचेपी दूर करण्याच्या हेतूने राज्य सरकारने सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या आणि सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांच्या शाळांत मराठी विषय शिकविण्याचा बऱ्याच वर्षापासून आग्रह धरला.**

## मराठीची 'कायदेशीर' अवहेलना

त्यासाठी शासन निर्णय-परिपत्रके निघाली. राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमात मराठी विषय भाषा व्यवस्थेमध्ये अंतर्भूत असल्यामुळे त्या अंतर्गत अनुदानित अथवा विनाअनुदानित शाळांतील मराठी मातृभाषा नसलेले विद्यार्थी मराठी भाषेची लेखन, वाचन व संभाषण कौशल्ये अवगत करू शकलेत. त्यामुळे राज्य मंडळाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आणि त्यानंतरही मराठी भाषकांशी संवाद साधताना अन्य भाषांचा अवलंब करण्याची गरज उरली नाही. परंतु, मुंबई आणि राज्यातील अन्य शहरांत तसेच काही प्रमाणात ग्रामीण भागात राज्याबाहेरील शिक्षण मंडळाचे अभ्यासक्रम सुरू आहेत. यामधील आयजीसीएसई व आयबी या अभ्यासक्रमात मराठीचा पर्याय निवडणे त्यांच्या भाषा व्यवस्थेमुळे शक्य होत नाही. सीबीएसई आणि आयसीएसईच्या अभ्यासक्रमात आठवीपर्यंत मराठीचा पर्याय आहे. इयत्ता ९ वी १० वी च्या स्तरावर मात्र मराठी भाषा घेणारे विद्यार्थी फारसे नसतात. या व्यवस्थेमुळे महाराष्ट्राबाहेरील शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये मराठी विषय एकतर शिकविला जात नव्हता आणि जेथे शिकविला जात होता, तेथे अध्ययन, अध्यापन आणि मराठी विषयाच्या मूल्यमापनाबाबत अपेक्षित गांभीर्य नव्हते.



राज्याबाहेरील शिक्षण मंडळाच्या शाळेत मराठी विषय शिकविण्याबद्दल वाढत जाणारा निरुत्साह दिवसेंदिवस वाढतच गेला. राज्यातील प्रत्येक शाळेत मराठी विषयाचे अध्यापन करणेबाबत राज्य सरकारने काढलेले आदेश आणि परिपत्रके दुर्लक्षित आहेत. शाळा व्यवस्थापन आणि राज्याबाहेरील शिक्षण मंडळांनी मराठीचे अध्ययन आणि अध्यापन आपल्या शाळेत असावे, यासाठी सरकारने २ मार्च २०२० च्या अधिसूचनेद्वारे मराठी विषय सर्व प्रकारच्या शाळांतून सक्तीने शिकवावा, असा कायदा आणला. यानुसार सर्व अभ्यासक्रमांच्या शाळेतील इयत्ता १ ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषा शिकणे सक्तीचे केले. कायदा न पाळणाऱ्या संस्थांचे इतर शिक्षण मंडळांना संलग्न होण्यास दिलेले ना हरकत प्रमाणपत्र काढून घेणे, शाळांना परवानगी देताना अथवा आरटीई मान्यता देताना सक्तीच्या मराठी अध्यापनाची पूर्वअट घालणे व एक लाखापर्यंतचा दंड इत्यादी कारवाई या कायद्यात आहे. तसेच, या कारवाईच्या विरोधात न्यायालयात जाण्यास प्रतिबंध करण्यात आला. हा कायदा सर्व प्रकारच्या शाळांतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी सक्तीने शिकविण्यास बाध्य ठरविणारा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ‘कुस्तीपटूंनी राजस्थानमध्ये आंदोलन न्यावे

## भाजपाची डोकेदुखी वाढेल’, माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचा कुस्तीपटूंना सल्ला

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**भाजपाचे खासदार आणि कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचे आरोप करून खळबळ उडवून दिली. त्यानंतर आता कुस्तीपटूंच्या पाठिंब्यासाठी एकापाठोपाठ एक महापंचायत आयोजित केल्या जात आहेत. यामुळे हरियाणा आणि आसपासच्या परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.**



मागच्या चार दिवसात उत्तर प्रदेशच्या मुझफ्फरनगर, हरियाणाच्या कुरुक्षेत्र आणि सोनिपत जिल्ह्यात तीन महापंचायती पार पडल्या आहेत. जम्मू आणि काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनीही कुस्तीपटूंना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, “कुस्तीपटूंनी राजस्थानमध्ये जाऊन आंदोलन करावे. त्याठिकाणी त्यांना पाठिंबा मिळू शकतो. राजस्थानमध्ये येत्या काळात विधानसभेच्या निवडणुका होत आहेत, त्यामुळे या राजकीय वातावरणाचा कुस्तीपटूंच्या आंदोलनाला फायदा होऊ शकतो.” २८ मे रोजी दिल्लीमध्ये पोलिसांनी बळाचा वापर करून कुस्तीपटूंना ताब्यात घेतले. त्यानंतर लगेचच कुस्तीपटूंच्या पाठिंब्यासाठी तीन महापंचायत आयोजित करण्यात आल्या होत्या. पोलिसांनी आंदोलनस्थळावरून हुसकावल्यानंतर कुस्तीपटूंनी आपली पदके गंगेत विसर्जित करण्याची भूमिका जाहीर केली, त्यानंतर कुस्तीपटूंच्या बाजूने भावनेची एक लाट तयार झाली. सध्या सुरू असलेल्या आंदोलनातील आघाडीचे कुस्तीपटू हे हरियाणामधील ग्रामीण भागातून येतात. त्यामुळे ग्रामीण भागात या विषयावर आधीच संतापाची लाट होती, हे लोण आता इतर परिसरातही पोहोचले आहे.

मुंबईतील जिमचे मालक ते ‘चिकन लेग पीस’ अशी खास ओळख; सोशल मीडिया स्टार उल्हास कामठे आहेत तरी कोण?

रविवारी सोनिपत जिल्ह्यातील मुंडलाना गावात महापंचायत आयोजित करण्यात आली होती. दलित नेते आणि भीम आर्मीचे प्रमुख चंद्रशेखर आझाद, राष्ट्रीय लोक दलाचे (RLD) नेते जयंत चौधरी यांनीही कुस्तीपटूंच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. विविध परिसरातून लोक या महापंचायतीमध्ये सहभागी होण्यासाठी येत आहेत. शेतकरी आणि खाप नेते या महापंचायतीला संबोधित करत आहेत. महापंचायतींनी कुस्तीपटूंना पाठिंबा दर्शविला असून कुस्तीगीर महासंघाचे अध्यक्ष खासदार ब्रिजभूषण सिंह यांच्या अटकेची मागणी केली आहे.

### कुस्तीपटूंना वाढता पाठिंबा

हरियाणामधील विरोधकांनी कुस्तीपटूंच्या आंदोलनावर याआधीच आक्रमकपणे भूमिका घेतलेली असून भाजपा-जेजेपी आघाडी सरकारवर टीका केली आहे. हरियाणा सरकारने कुस्तीपटूंच्या विषयाला योग्यरितीने हाताळले नसल्याचा ठपका विरोधकांनी ठेवला आहे. हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपिंदर सिंह हुड्डा यांनी या संवेदनशील विषयावर भाजपाचे नेते मौन बाळगून का आहेत? असा सवाल उपस्थित करून त्यांना कोंडीत पकडले आहे. कुस्तीपटूंना वाढता पाठिंबा पाहता विरोधकांना हरियाणा सरकारच्या विरोधात राळ उठविण्यासाठी आयतेच कोलीत हाती लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

# राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या चर्चा

## उत्तर महाराष्ट्रातून शिंदे फडणवीसांच्या टीममध्ये कुणाला संधी?

| नाशिक | महाईन्यूज

**काँग्रेसने राज्यातील मंत्रिमंडळ विस्ताराला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हिरवा कंदील दर्शविल्यानंतर संभाव्य मंत्र्यांच्या नावांची चर्चा सुरू झाली आहे. नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातून शिंदे-फडणवीस सरकारमध्ये चार मंत्री असले, तरी हा आकडा आता वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातून कोणाची मंत्रिपदी वर्णी लागणार याकडे साऱ्यांचेच लक्ष लागले आहे.**



नाशिक जिल्ह्यातून शिंदे गटाकडून सुहास कांदे आणि भाजपकडून प्रा. देवयानी फरांदे किंवा डॉ. राहुल आहेर यांना मंत्रिमंडळात बढती दिली जाण्याची शक्यता आहे. धुळ्यातून जयकुमार रावल आणि जळगावमधून चिमणराव पाटील यांच्या नावांचीही चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या वर्षी जूनमध्ये शिवसेनेत बंड करीत थेट भाजपसोबत जात सरकार बनविले. शिवसेनेतील जवळपास ४० आमदार आणि १३ खासदारांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडत एकनाथ शिंदेंसोबत घरोबा केला होता. शिवसेनेतील हे बंड सर्वोच्च न्यायालय, तसेच केंद्रीय निवडणूक आयोगापर्यंत पोहोचले होते. शिवसेना कुणाची या वादात निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदेंच्या बाजूने निकाल दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने सत्तांतराचा निकाल देताना शिंदे गटाने नियुक्त केलेले प्रतोद बेकायदेशीर ठरवत मुख्यमंत्री शिंदेंना अभय दिले होते. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने तरल्यानंतर आता मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चा सुरू आहेत.

पहिल्या टप्प्यात शिंदे गटाचे नऊ, तर भाजपचे नऊ असे १८ मंत्री झाले होते. त्यामुळे मंत्रिमंडळ विस्ताराबाबत सध्या खलबते सुरू झाली असून, मुख्यमंत्री शिंदेंनी सोमवारी दिल्लीत गृहमंत्री शहा यांची भेट घेतली. त्या भेटीत मंत्रिमंडळ विस्ताराचेही ठरल्यानंतर आता मंत्रिमंडळात सहभागी होणाऱ्या संभाव्य नावांची चर्चा सुरू झाली आहे. त्यात उत्तर महाराष्ट्रातूनही भाजपच्या कोट्यातून महिला म्हणून आमदार देवयानी फरांदे यांनी संधी मिळणार असल्याची चर्चा आहे. नाशिकमधून शिंदे गटाकडून पालकमंत्री दादा भुसे यांचा समावेश असला, तरी नांदगावचे आमदार सुहास कांदे यांनाही राज्यमंत्रिपदाची लॉटरी लागण्याची शक्यता आहे. कांदेंकडे आक्रमकता असल्यामुळे त्यांचा वापर पक्षवाढीसाठी शिंदे गटाकडून केला जाण्याची शक्यता आहे. जळगावमधून शिंदे गटाच्या कोट्यातून आमदार चिमणराव पाटील यांच्याही नावाची चर्चा सुरू आहे.

### गावित की पाडवी, असा संघर्ष?

राज्य मंत्रिमंडळात धुळे आणि नंदुरबार या दोन जिल्ह्यांपैकी केवळ नंदुरबारमधून डॉ. विजयकुमार गावित यांची वर्णी लागली आहे. धुळ्यातून जयकुमार रावल यांना पहिल्या टप्प्यात वगळण्यात आले होते. त्यामुळे नव्या विस्तारात त्यांच्या नावाचीही चर्चा सुरू आहे. आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्याऐवजी जयकुमार रावल यांचा समावेश होईल, अशीही भाजपच्या वर्तुळात चर्चा आहे. दुसरीकडे नंदुरबारमधील तळोद्याचे आमदार राजेश पाडवीदेखील मंत्रिपदाच्या शर्यतीत आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ‘गुडबुक’मध्ये पाडवी असल्यामुळे ऐनवेळी त्यांनाही मंत्रिपदाची संधी मिळण्याची शक्यता आहे.

# ठाकरे गटाला लवकरच खिंडार पडणार, उद्धव यांना आव्हान देत श्रीकांत शिंदेंचं मोठं वक्तव्य

| मुंबई | महाईन्यूज |



आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांनी आता थेट उद्धव ठाकरे यांनाच आव्हान देण्याची तयारी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून त्यांनी मंगळवारी प्रभादेवी, दादर या शिवसेनेच्या बालेकिल्ल्यातील शाखांना भेटी देत तेथील शिवसैनिकांशी संवाद साधला.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीकांत शिंदे यांनी शिवसेना शाखा संपर्क अभियान सुरू केले असून, ते मुंबईतील विविध शाखांना भेट देत आहेत. यानिमित्त ते शिवसैनिकांशी चर्चा करत आहेत. याअंतर्गत त्यांनी प्रभादेवी, दादर शाखांना भेट दिली. शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर यांचे कार्यालय हे शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या 'सामना' दैनिकाच्या दारासमोरच आहे. त्या कार्यालयालाही त्यांनी भेट दिली.

मागील काही दिवसांपासून खासदार शिंदे यांनी मुंबईतील शिवसेना शाखांच्या भेटी वाढवल्या आहेत. याआधी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आव्हान देत ठाण्यातून निवडणूक लढण्याची भाषा केली होती. सर्वसामान्य शिवसैनिक कुणाच्या मागे आहेत हे एकदा पाहूयाच, असेही त्यांनी यावेळी म्हटले होते. या पार्श्वभूमीवर आता खासदार शिंदे हे सक्रिय झाले असून, त्यांनीही 'सामना'च्या दारातील शाखेला भेट देत थेट उद्धव यांनाच आव्हान दिल्याचे बोलले जात आहे. खासदार शिंदे यांच्या कल्याण लोकसभा मतदारसंघावर भाजपकडून दावा करण्यात आल्याबाबतचा प्रश्न प्रसारमाध्यमांनी विचारला असता, 'कल्याण लोकसभा मतदारसंघात भाजप उमेदवार उभा करणार असे कोण म्हणाले त्याचे नाव द्या', असा उलट प्रश्न त्यांनी विचारला.'

# सोनम कपूरने मुंबईतील विकला आलिशान फ्लॅट

बॉलीवूड इंडस्ट्रीत गेल्या काही काळापासून सेलेब्स आपली जुनी प्रॉपर्टी विकून मुंबईत नवीन प्रॉपर्टी खरेदी करत आहेत. गेल्या वर्षी जान्हवी कपूर, अभिनेता शाहिद कपूरसह अनेक सेलिब्रिटींनी आलिशान घरे खरेदी केली होती. त्याचवेळी सोनम कपूरबद्दल बातम्या येत आहेत की तिने मुंबईतील तिचा एक फ्लॅट विकला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, सोनम कपूरने नुकताच तिचा 7 वर्ष जुना फ्लॅट विकला आहे. सोनम कपूरचा हा आलिशान फ्लॅट बीकेसी, मुंबईच्या सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक्टमध्ये होता. अभिनेत्रीने 29 डिसेंबरला तिचा फ्लॅट 32.5 कोटींना विकला आहे. अभिनेत्रीने फ्लॅट 2015 मध्ये 31.48 कोटी रुपयांना विकत घेतला होता. त्याच वेळी, तिने हा फ्लॅट आता 1 कोटीच्या नफ्यासह विकला आहे. सोनमचे हे घर एसएमएफ इन्फ्रास्ट्रक्चर नावाच्या प्रसिद्ध कंपनीने विकत घेतल्याचे सांगितले जात आहे. अभिनेत्रीचा हा फ्लॅट मुंबईतील बीकेसी अर्थात बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्सच्या सीबीडीमध्ये होता. सोनमचे हे घर सिग्नेचर आयलँड नावाच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर होते. याआधी सोनमची चुलत बहीण जान्हवी कपूरनेही तिचे एक घर विकले होते, जे



## कतरिना झालीय अस्सल गृहिणी! दर आठवड्याला घरात घेते बजेट मीटिंग

नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत विकीने सांगितले की, त्याची पत्नी कतरिना कैफ घरातील कर्मचाऱ्यांसोबत आठवड्याची बजेट मीटिंग घेते. विकीला हे सर्व खूप मनोरंजक वाटते. विकी कौशलने सांगितले की, त्याला कतरिना कैफला हे करताना बघायला आवडते. हे अगदी तसे आहे जसे प्रेक्षकांच्या गर्दीत बसून आपण एखादा सुंदर चित्रपट पाहतो. तो पुढे म्हणाला, कोणत्या गोष्टींवर किती खर्च केला जाईल या सर्व गोष्टीचा हिशोब कतरिना ठेवते आणि ही खूप चांगली गोष्ट आहे. लग्नापूर्वी विकी आणि कतरिनाने एकमेकांना गुपचूप डेट केले होते. त्यानंतर दोघांनी डिसेंबर २०२१ मध्ये राजस्थानमधील सवाई माधोपूरमध्ये लग्न केले. लग्नाला फक्त त्यांचे जवळचे मित्र आणि कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. दोघेही बॉलिवूडमधील लोकप्रिय जोडप्यांपैकी एक आहेत.

कतरिनाबद्दल बोलताना विकी कौशलने आपली पत्नी आठवड्याचे बजेट कसे सांभाळते याबद्दल सांगितले. न्यूज तकशी संवाद साधताना विकी म्हणाला, 'सर्वात मजेदार गोष्ट म्हणजे कतरिना दर आठवड्याला घरी मीटिंग घेते. ती सर्व कर्मचाऱ्यांना एकत्र बोलावते आणि त्यांच्याशी घराच्या बजेटवर चर्चा करते. पैसा कुठे खर्च करायचा आहे याचा हिशोब ती ठेवते. पण ही सगळी चर्चा सुरू असताना मी प्रेक्षकांप्रमाणे खूप एन्जॉय करतो. या दरम्यान मी पॉपकॉर्न घेऊन बसतो.



## शाहरुखचा मुलगा आर्यन खान सुपर हॉट नोरा फतेहीला करतोय डेट?




मनोरंजनाच्या जगात सेलिब्रिटी कोण कधी कोणाला डेट करेल सांगता येत नाही. ताजं उदाहरण शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान प्रसिद्ध मॉडेल -डान्सर नोरा फतेहीला डेट करत असल्याची चर्चा आहे.

स्टार्समधील लिंकअप आणि ब्रेकअपच्या चर्चा या नेहमीच होत असतात. सध्या सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे ते या चर्चेने बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान डान्सिंग दिवा नोरा फतेहीला डेट करत असल्याचं बोललं जात आहे.

झालं अस की, सोशल मीडियावर दोन्ही स्टार्सचे काही फोटो व्हायरल होत आहेत. अलिकडे आर्यनच नाव अन्यना पांडे बरोबर जोडलं गेलं होतं पण एका पार्टीमध्ये आर्यनने अन्यनाला चक्क इग्नोर केले होते. झालं असं की दुबईमध्ये आर्यन खानने न्यू इयरची पार्टी दिली होती. या पार्टीमध्ये हार्दिक सिंधूशिवाय त्याचे अनेक मित्र दिसले. नोरादेखील पार्टीमध्ये होती. एका फोटोमध्ये आर्यन दिसत आहे तर दुसऱ्या चित्रात नोरा फतेही आहे. मात्र, या फोटोंमध्ये आर्यन आणि नोरासोबत एकच फॅन दिसत आहे. मग काय, लोकांची नजर त्यावर पडताच दोघेही एकमेकांना डेट करत असून गुपचूप एकमेकांसोबत वेळ घालवत असल्याचे नेटिझन्सचे म्हणणे आहे. वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले तर नोरा फतेही शेवटची 'अॅन अॅक्शन



## सलमान खानबरोबर काम करायला नकार





अमृताचा जन्म ७ जून १९८१ रोजी मुंबईत एका कोकणी कुटुंबात झाला. अमृताचे वडील उद्योगपती आहेत. अमृता शिकत असताना तिला मॉडेलिंगची आवड निर्माण झाली. त्यानंतर तिनं अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण केलं. २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या अब के बरस हा अमृताचा पहिला सिनेमा होता. त्यानंतर २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या इश्क विश्क या सिनेमात तिनं काम केलं आणि त्यातून तिला ओळख मिळाली.. याच सिनेमासाठी अमृता पदार्पणासाठी सर्वोत्तम अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता.

त्यानंतर अमृता झळकली ती शाहीद कपूर याच्या विवाह सिनेमात. या सिनेमात अमृतानं साकारलेली भूमिका खूपच गाजली. याच भूमिकेमुळे ती लोकप्रिय देखील झाली. हिंदीबरोबरच अमृतानं तेलुगु सिनेमांतही काम केलं. याशिवाय अमृताला हिंदी, इंग्रजी, तेलुगु, कोकणी, मराठी भाषा देखील बोलता येतात.

२०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या प्रेम रतन धन पायो या सिनेमासाठी अमृता राव हिला कामासाठी विचारणा झाली होती. या सिनेमात तिला सलमान खानच्या बहिणीची

# टीम इंडिया बनणार वर्ल्ड चॅम्पियन

## रोहितच्या नेतृत्वाखाली WTC फायनलमध्ये आश्चर्यकारक योगायोग

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

धोनीचा जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या (WORLD TEST CHAMPIONSHIP) अंतिम सामन्यासाठी भारतीय संघ सज्ज झाला आहे. टीम इंडियाची स्पर्धा ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. या सामन्यापूर्वी असा एक योगायोग पाहायला मिळत आहे. तो लक्षात घेतला तर असे वाटते की, कसोटी चॅम्पियनशिपची ट्रॉफी भारताकडेच येणार आहे. त्याचे कनेक्शन थेट कर्णधार रोहित शर्माशी जोडले गेले आहे.



कौशल्य आणि उत्कटतेने भरलेला भारतीय क्रिकेट संघ बुधवारी ऑस्ट्रेलियाच्या बलाढ्य संघाविरुद्ध जागतिक कसोटी चॅम्पियनशिपचा (WTC फायनल) अंतिम सामना खेळणार आहे. आयसीसी जेतेपदाचा दशकभराचा दुष्काळ संपवण्यासाठी रोहित शर्माच्या संघाचे लक्ष असणार आहे. डब्ल्यूटीसीच्या मागील दोन चक्रांमध्ये भारत हा सर्वात सातत्यपूर्ण कामगिरी करणारा संघ आहे. गेल्या १० वर्षांतील एक किंवा दोन स्पर्धा वगळता, भारत प्रत्येक वेळी नॉकआऊटमध्ये पोहोचला आहे, परंतु पुन्हा विजेतेपद जिंकू शकला नाही.

यावेळी एक गोष्ट विशेष आहे, जी यापूर्वीच्या कोणत्याही स्पर्धेत घडलेली नाही. रोहित शर्मा प्रथमच आयसीसी स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाचे नेतृत्व करत आहे. कर्णधार म्हणून रोहितने कोणत्याही स्पर्धेचा अंतिम सामना एकदाही गमावलेला नाही. त्याच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने ५ वेळा अंतिम फेरी गाठली आहे. प्रत्येक वेळी संघाने जेतेपद पटकावले आहे. चॅम्पियन्स लीगमध्येही मुंबईचे कर्णधार असताना रोहितने एकदा विजेतेपद पटकावले आहे. महेंद्रसिंग धोनीसारख्या दिग्गज कर्णधाराला त्याने तीन वेळा पराभूत केले आहे.

### टीम इंडियासाठी दोन फायनलही जिंकल्या

विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाला एकही फायनल जिंकता आलेली नाही. मात्र विराटने विश्रांती घेतल्यानंतर रोहित शर्माकडे कर्णधारपद मिळाले तेव्हा टीम इंडियाने दोनदा ही स्पर्धा जिंकली आहे. भारताने २०१८ मध्ये निदाहास ट्रॉफी जिंकली होती. आशिया कप २०१८ मध्येही रोहित शर्मा भारताचा कर्णधार होता. सर्वात रोमांचक बाब म्हणजे दोन्ही सामन्यात भारतीय संघाने शेवटच्या चेंडूवर विजय मिळवला आहे. आयपीएलमध्येही मुंबईने शेवटच्या चेंडूवर दोनदा विजय मिळवला आहे.

### सर्वात मोठा असेल विजय

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकली तर ती त्याच्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी ट्रॉफी असेल. त्यामुळे भारतीय संघाचा दुष्काळही संपणार आहे.

### क्रिकेटच्या जगतात इतिहास रचणार

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ७ जून ते ११ जून दरम्यान इंग्लंडमधील केनिंग्टन ओव्हल मैदानावर खेळवला जाणार आहे. यावेळी टीम इंडियाचा धाकड फलंदाज विराट कोहली क्रिकेट विश्वात इतिहास रचण्याच्या अगदी जवळ आहे. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज विराट कोहली एक मोठा विक्रम आपल्या नावावर करणार आहे. आतापर्यंत हा महान विक्रम आपल्या नावे करण्यात सध्या खेळत असलेल्या कोणत्याही फलंदाजाला यश आलेलं नाही. ७ जून ते ११ जून दरम्यान इंग्लंडच्या केनिंग्टन ओव्हल (लंडन) मैदानावर होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाविरुद्ध ११२ धावा केल्या तर तो ICC नॉकआऊट सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनेल. विराट कोहलीने हा महान विक्रम केला तर तो क्रिकेट विश्वात इतिहास रचेल.

जर विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात११२ धावा केल्या तर तो सचिन तेंडुलकर आणि रिकी पॉंटिंगचा विश्वविक्रम मोडेल. सध्या ICC बाद फेरीत सर्वाधिक धावा करण्याचा विश्वविक्रम ऑस्ट्रेलियाचा महान कर्णधार रिकी पॉंटिंगच्या नावावर आहे. रिकी पॉंटिंगने ICC नॉकआऊट सामन्यात १८ डावात ७३१ धावा केल्या आहेत. या यादीत क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे. सचिन तेंडुलकरने ICC बाद फेरीत १४ डावात ६५८ धावा केल्या आहेत.

विराट कोहलीने आतापर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २५,३२२ धावा केल्या आहेत. सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आतापर्यंत सर्वाधिक ३४,३५७ धावा केल्या आहेत.

# फ्रेंच खुली टेनिस स्पर्धा: जोकोव्हिच उपांत्य फेरीत, महिला गटात सबालेन्का, मुचोव्हाचाही आगेकूच

## कारेन खाचानोव्हवर 4-6, 7-6 (7-0), 6-2, 6-4 विजय

। पॅरिस ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

सर्बियाच्या तिसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोव्हिचने फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर, महिला एकेरी गटात अरिना सबालेन्का आणि चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हा यांनी आपापल्या उपांत्यपूर्व सामन्यात विजय नोंदवत उपांत्य फेरीत धडक मारली.



जेतेपदाच्या प्रबळ दावेदारांपैकी एक असलेल्या जोकोव्हिचने कारेन खाचानोव्हवर ४-६, ७-६ (७-०), ६-२, ६-४ असा विजय नोंदवला. पहिल्या सेटमध्ये खाचानोव्हने जोकोव्हिचला चांगली टक्कर दिली. त्याने सेट ६-४ असा जिंकत आघाडी घेतली. यानंतर मात्र, जोकोव्हिचने आपला खेळ उंचावताना खाचानोव्हला पुनरागमनाची संधीच दिली नाही आणि सलग तीन सेट जिंकत उपांत्य फेरीतील आपली जागा निश्चित केली. पुरुष एकेरीत डेन्मार्कच्या होल्गर रूनने अर्जेंटिनाच्या फ्रॅन्सिस्को सेरुनडोलोला ७-६ (७-३), ३-६, ६-४, १-६, ७-६ (१०-७) असे चुरशीच्या लढतीत नमवले.

महिला एकेरीत दुसऱ्या मानांकित सबालेन्काने युक्रेनच्या एलिना स्वितोलिनावर ६-४, ६-४ असा विजय मिळवला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच सबालेन्काने स्वितोलिनावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सबालेन्काच्या अचूक फटक्यांचे स्वितोलिनासमोर उत्तर नव्हते. अन्य सामन्यात, बिगरमानांकित मुचोव्हाने २०२१च्या उपविजेत्या अनास्तासिया पावलुचेनकोव्हाला ७-५, ६-२ असे सरळ सेटमध्ये नमवत स्पर्धेची प्रथमच उपांत्य फेरी गाठली. तिने दुसऱ्यांदा ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला. फ्रेंच टेनिसमध्ये गेल्या वर्षी तिने तिसरी फेरी गाठली होती. पावलुचेनकोव्हाचा गेला सामना तीन तासांहून अधिक चालला. त्यामुळे सामन्यातील खेळावर त्याचा परिणाम जाणवला. पहिल्या सेटमध्ये आव्हान उपस्थित करणाऱ्या पावलुचेनकोव्हाला दुसऱ्या सेटमध्ये फार काही करता आले नाही. अन्य सामन्यात, अग्रमानांकित पोलंडच्या इगा श्वीऑनटेकला युक्रेनच्या लेसिया त्सुरेन्कोविरुद्ध पुढे चाल मिळाली.

# लंडनच्या ओव्हल मैदानात भारत-ऑस्ट्रेलिया भिडणार

।लंडन।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा फायनलचा सामना ७ जूनपासून सुरु होणार आहे. लंडनच्या ओव्हल मैदानात हा सामना खेळवला जाणार असून ११ जूनला या फायनलचा अंतिम दिवस असणार आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या लीग टेबलमध्ये १५२ गुण मिळवून ऑस्ट्रेलियाने अव्वल स्थान गाठलं आहे. तर भारताने १२७ गुण मिळवून दुसऱ्या क्रमांकावर भरारी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये पदार्पण केलं असून भारत दुसऱ्यांदा या फायनलमध्ये पोहोचला आहे. २०२१ मध्ये झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनल सामन्यात न्यूझीलंडने भारताचा ८ विकेट्सने पराभव केला होता. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात झालेल्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीत भारताने २-१ ने बाजी मारत किताब जिंकला होता. त्यानंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये भारताने प्रवेश केला.




भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलचे लाईव्ह प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्क होणार आहे. सामना ७ जूनला दुपारी ३ वाजता सुरु होणार आहे. डिझ्ने स्टार इंडिया गाईडनुसार, या फायनलच्या सामन्याचे लाईव्ह प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स १, स्टार स्पोर्ट्स २, स्टार स्पोर्ट्स ३, स्टार स्पोर्ट्स १ हिंदी, स्टार्स स्पोर्ट्स वन एचडी, स्टार स्पोर्ट्स २ एचडी, स्टार स्पोर्ट्स वन हिंदी एचडी, स्टार स्पोर्ट्स वन तामिळ, स्टार स्पोर्ट्स वन तेलुगु आणि स्टार स्पोर्ट्स वन कन्नडा.